महा मेट्रो

PUNE METRO

## महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## पीसीएमसी  पत्रकारांचा नागपूर मेट्रोचा अभ्यास दौरा

## प्रकल्पाचे केले कौतुक

पीसीएमसी  २७ : महा मेट्रो अंतर्गत नागपूर आणि पुणे आणि  पीसीएमसी  या दोन्ही शहरात मेट्रो प्रकल्पाचे काम जोमाने सुरु आहे .मेट्रो प्रकल्पासमंधी काही महत्वाच्या बातम्या नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य स्थानीय पत्रकारआपल्या वृत्तपत्र आणि इतर माध्यमांच्या मदतीने नेहमीच करीत असतात. दरम्यान मंगळवार दिनांक २७ मार्च'ला  पीसीएमसीच्या पत्रकारांचा मेट्रो प्रकल्पाची माहिती घेण्याकरता अभ्यास दौरा नागपुरात आयोजित करण्यातआला होता. ठरल्याप्रमाणे १६ पत्रकारांची एक चमू आज सकाळी नागपुरात दाखल झाली. या पत्रकारांच्या या पथकात वृत्तपत्र , चॅनल्स , वेब-पोर्टल आणि स्थानिक केबल नेटवर्क चे प्रतिनिधी सहभागी झाले होते. नागपूर विमानतळाहून शहरात दाखल होत असताना मेट्रोचे व्हर्टिकल गार्डन असलेले मेट्रोचे पिलर पाहताच पत्रकारांचा उत्साह वाढला. त्यामुळे दिवसभराच्या दौऱ्यासाठी त्यांची उत्सुकता वाढत गेली.

पथकाचा अभ्यास दौरा उत्तर अंबाझरी मार्गावरील प्रस्तावित इंस्टीट्युशांन पासून सुरु झाला. या स्टेशन'चे बांधकाम, वैविध्य संबंधी माहिती पत्रकारांनी संबंधित मेट्रो अधिकाऱयांकडून जाणून घेतली. पुढे सुभाष नगरमेट्रो स्टेशनचे सुरु असलेले बांधकाम पत्रकारांनी न्याहाळले. अंबाझरी तलावाला लागून असल्याने या स्टेशनचे लोकेशन पत्रकारांना आवडले.

नागपूर मेट्रो प्रकल्पाचा एक अविभाज्य अंग हा वर्धामार्गावरील डबल डेकर होय. या डबल डेकर समंधी विस्तृत माहिती पत्रकारांनी जाणून तर घेतलीच शिवाय असाच डबल डेकर पुण्याला बांधण्यात आला तर पुण्यातील वाहतुकीची कोंडी कमी होण्यास मदत होईल,अशी अशा देखील व्यक्त केली. तर प्रकल्पाची पाहणी करत असताना मेट्रो प्रकल्पाच्या कार्या दरम्यान वाहतुकीचे सुयोग्य व्यवस्थापन आणि त्याला नागरिकांचे सहकार्य पाहता शहराविषयी आणि शहराच्या या महत्वाकांक्षी प्रकल्पायी कौतुक केले .

नागपूरच्या या प्रकल्पाच्या पहिल्या टप्यात खापरी ते एअरपोर्ट साऊथ स्टेशन या मार्गावर मेट्रो रेल लवकरच धावणार आहे. या तीनही स्टेशनची पाहणी आणि त्याचा आर्किटेक्चर समंधी विस्तृत माहिती पत्रकारांनी अधिकाऱ्यांकडून प्राप्त केली.

नागपूर मेट्रो प्रकल्पाच्या कार्याची गती पाहता कार्याची हिच गती भविष्यात पुणे मेट्रो प्रकल्पात सुद्धा कायम राहावी अशी अपेक्षा देखील यावेळी पत्रकारांनी व्यक्त केली. देशाचा केंद्र बिंदू असलेल्या झिरो माईल स्टोनआणि त्याच्या सभोवताली असलेला देखावा बघण्यास पत्रकार विसरले नाही. यासर्व दौऱ्याचा शेवट मेट्रो भवन येथे झालेल्या चर्चेने संपन्न झाला. या चर्चेत महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी पत्रकाराना संभोधित केले. नागपूर मेट्रो प्रकल्पाबद्दल चर्चा करताना पुणेच्या पत्रकारांनी आपल्या शहरातील मेट्रो प्रकल्पासमंधी प्रश्न श्री दीक्षित यांना विचारले. पुणे येथील चारही दिशेने सुरु असलेल्या मेट्रो प्रकल्पाच्या काम समंधीची सखोल माहिती पत्रकारांनी जाणून घेतली. पुणे शहरातील मेट्रो प्रकल्प हा तेथील वाहतूक कोंडीवर एकमेव उपाय असल्याने हा प्रकल्प त्वरेने पूर्ण करण्या समंधीची आग्रही मागणी देखील त्यांनी डॉ दीक्षित यांना केली.